# १०. धाडसी हाली



पुरस्कारासह हाली बरफ

तुम्हांला कशाची भीती वाटते ? कोणी म्हणेल, 'झुरळांची.' कोणी म्हणेल, 'छट्, झुरळाला काय घाबरायचं ? आपण जवळ गेलो तरी ते पळून जातं.' कोणी म्हणेल, 'मला अंधाराची भीती वाटते.' त्यावर कोणी म्हणेल, 'अंधाराची भीती? त्यात काय असतं घाबरण्यासारखं ? दिवा लावला की अंधार गायब !' पण समजा तुम्हांला कोणी विचारलं, की 'तुमच्यासमोर एखादा वाघ किंवा बिबट्या उभा आहे, तर तुम्हांला काय वाटेल ?' 'छे! वाघाला काय घाबरायचं ?' असं म्हणायची हिंमत कोणी करेल ? नाही ना ? पण आपण अशा एका मुलीला भेटणार आहोत जी वाघाला घाबरून पळाली नाही. उलट तिने वाघापासून तिच्या बहिणीला वाचवले. हाली बरफ ही ती धाडसी मुलगी. या धाडसाबद्दल नवी दिल्ली येथे मा. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते सन २०१३ मध्ये 'वीर बापूराव गायधनी राष्ट्रीय शौर्य पुरस्कार' देऊन तिचा गौरव करण्यात आला.

ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात तानसा धरण आहे. या धरणाच्या परिसरात अभयारण्य आहे. तेथे विविध प्रकारचे जंगली प्राणी आहेत. या भागात वेगवेगळ्या पाड्यांवर आदिवासी राहतात. त्यांचे जीवन जंगलावर अवलंबून आहे. त्यामुळे जंगलात त्यांचा सतत आणि सहज वावर असतो. जंगलाची, तिथल्या प्राण्यांची त्यांना खडान्‌खडा माहिती असते. ते निर्भय असतात. जंगल ही आपली संपत्ती आहे. तिचे संवर्धन कसे करावे हे आदिवासी जाणतात.

तानसा धरणाच्या परिसरातील आटगावजवळ नांदगावच्या जमनाचा पाडा आहे. तेथे हाली बरफ ही मुलगी आपल्या कुटुंबासोबत राहत होती. निसर्गाच्या सहवासात लहानाची मोठी झालेली पाणीदार डोळ्यांची, सावळ्या रंगाची, काटक हाली बरफ ही वारली या आदिवासी समाजाची आहे. हालीचे वडील रघुनाथ हे रेल्वेत कामाला होते. एका अपघातात त्यांचा एक हात निकामी झाला. घरच्या गरिबीशी झुंज देणाऱ्या हालीने नेमके कोणते धाडस दाखवले ? चला, आपण तिच्याकडूनच ऐकूया. हालीची घेतलेली ही मुलाखत काळजीपूर्वक समजावून घ्या.

**प्रश्न** : तू जंगलात कशासाठी गेली होतीस ? तुझ्यासोबत कोण होतं ?

**हाली** : लाकरा आनाला गेलतू, माझे सोबत माझी मोठी बहीण (शकुंतला) होती. पाठीमागशी बहिणीवर वाघानं हाल्ला केला. तिचं पाठीचा लचका तोरला. मांडी आनी पायाचा लचका कारला. बहीण जखमी झाली.

प्रश्न : तुझ्या बहिणीवर हल्ला केल्यावर तू काय केलंस ?

हाली : मी आधी घाबर-घाबरशी झालू. मग दगडं आपटली. लांब-लांबची लोकं आरडावरडा केलंवर धावत आली. मी जोरात मोठी-मोठी दगडं आपटली. वाघाला दगडं लागली. मंग वाघ पलून गेला.

प्रश्न : लोकांनी काय मदत केली ?

हाली : मी आरडावरडा केला. तवा काही लोक लाकरा गोला करीत होती. ती पन धावत आली.



प्रश्न : ही गोष्ट बाकीच्या लोकांना कशी समजली ?

हाली : गावच्या लोकांनी सांगला.

प्रश्न : तुझ्या जखमी बहिणीला कुठे नेलं ?

हाली : पयल्यांदा शहापूरचे दवाखानत नेली.
मंग ठान्याचे सिविल हासपिटला नेली.

प्रश्न : तुझी बहीण वाचली का ?

हाली : बहीण वाचली.

प्रश्न : बहीण वाचली याबद्दल तुला काय वाटतं ?

हाली : आमाला बरा वाटला.

प्रश्न : तू बहिणीला वाचवलंस. त्यानंतर तुला कोणीकोणी मदत केली ?

हाली : आमचा मामा पांडु किरकिरे यानी लई मदत केली. गावचे लोक, शहापूरचे लोक यांनी सुदिक मदत केली. गावाचे शिक्षकांनी सुदिक मदत केली.

प्रश्न : तुझं पेपरात नाव आलं, बातमी छापून आली, तेव्हा तुला कसं वाटलं ?

हाली : चांगला वाटला.

प्रश्न : तू बहिणीला वाचवलंस, त्यामुळे तुला राष्ट्रीय शौर्य पुरस्कार मिळाला. तुला दिल्लीला येण्याचं आमंत्रण मिळालं. तू कोणासोबत दिल्लीला गेली होतीस ?

हाली : दिल्लीला माझे सोबत माझी आई, माझा मामा होता.

प्रश्न : दिल्लीला गेल्यावर तुला कसं वाटलं ? तेथील अनुभव सांग.

हाली : दिल्लीला गेलंवर चांगला वाटला. तिथं माझेसारखी दुसरी पन पोरा व्हती. काही पोरांची हत्तीवरशी मिरवणूक काढली. मी मोटारीशी फिरलू. चांगला खायाला मिलाला. खेलाला मिलाला. पंधरा दिस दिल्लीत व्हतू.

प्रश्न : तुला कोणाच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला ?

हाली : मला प्रधानमंत्र्यांनी पुरस्कार दिला.



**प्रश्न** : तू किती शिकलीस ?

**हाली** : मी शाळेन गेलू नाय. आमची गरिबी. कुटुंब मोठा, म्हनून शालेन गेलू नाय.

**प्रश्न** : तुझ्या धाडसाची घटना वाचणाऱ्या मुलामुलींना तू काय सांगशील ?

**हाली** : घाबरले नाय पायजे. लोकांना वाचवले पायजे.

**प्रश्न** : एवढा मोठा पुरस्कार तुला मिळाला. सगळ्यांनी तुझं कौतुक केलं. मग तुला काय वाटलं?

**हाली** : मला चांगला वाटला. पन मला काम मिलाला असता, त जास्ती चांगला वाटला असता.

**प्रश्न** : सध्या तू काय करत आहेस ?

**हाली** : मी लग्न करून रातांधळे पाड्याला राहती. दिवसभर मोलमजुरी करती.

हालीचे आभार मानून आम्ही निघालो, तेव्हा तिचं धाडस, तिची परिस्थिती यांचाच विचार आमच्या मनात होता.

(या पाठ्यपुस्तकासाठी ही मुलाखत मराठी कार्यगट सदस्य प्रा. जयवंत पाटील यांनी घेतली आहे.)

**शब्दार्थ :** **अभयारण्य –** प्राणी किंवा पक्ष्यांसाठी राखून ठेवलेला जंगलाचा भाग. **लाकरा –** लाकडे, लाकूडफाटा. **आनाला –** आणायला. **गेलतू –** गेले होते. **पाठीमागशी –** पाठीमागून. **हाल्ला –** हल्ला. **लचका –** शरीराचा तोडलेला मांसल भाग. **तोरला –** तोडला. **आनी –** आणि. **कारला –** काढला. **घाबर–घाबरशी –** घाबरी. **झालू –** झाले. **दगडं आपटली –** दगडं मारली. **आरडावरडा –** आरडाओरडा. **केलंवर –** केल्यावर. **मंग –** मग. **पलून –** पळून. **गोला –** गोळा. **सांगला –** सांगितले. **पयल्यांदा –** पहिल्यांदा. **सिविल हासपिट –** सिव्हिल हॉस्पिटल, सरकारी इस्पितळ. **आमाला –** आम्हांला. **लई –** खूप. **सुदिक –** सुद्‌धा. **गेलंवर –** गेल्यावर. **पन –** पण. **दुसरी पोरा –** इतर मुलं. **फिरलू –** फिरले. **खायाला –** खाण्यासाठी. **खेलाला –** खेळण्यासाठी. **मिलाला –** मिळाले. **दिस –** दिवस. **व्हतू –** होते. **शालेन –** शाळेत. **गेलू –** गेले. **नाय –** नाही.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) हालीला कोणता पुरस्कार मिळाला ?

(आ) हाली लाकडे गोळा करायला कुठे गेली होती ?

(इ) हालीच्या बहिणीवर कोणी हल्ला केला ?

(ई) हालीला दिल्लीला जाण्यासाठी कोणी मदत केली ?

(उ) हालीने कोणता संदेश दिला ?

**प्र. २.** हालीने दाखवलेल्या धाडसाचे वर्णन करा.

**प्र. ३.** हालीला 'वीर बापूराव गायधनी' हा राष्ट्रीय शौर्य पुरस्कार का मिळाला ?

**उपक्रम :** राष्ट्रीय शौर्य पुरस्कार मिळालेल्या धाडसी मुलांची माहिती मिळवा. वाचा. वर्गात सांगा.



## चला, वाचूया.


### वीर बापूराव गायधनी राष्ट्रीय शौर्य पुरस्कार

नाशिकमधील बापू गायधनी यांनी भीषण आगीतून लहान मुलांना आणि जनावरांना वाचवले. त्यासाठी त्यांनी स्वतःचा प्राण गमावला. स्वातंत्र्यपूर्व काळातल्या त्यांच्या या अतुलनीय शौर्याच्या स्मरणार्थ, स्वतःचा जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचवणाऱ्या शूर मुलामुलींना 'वीर बापूराव गायधनी राष्ट्रीय शौर्य पुरस्कार' दिला जातो. दरवर्षी असे जास्तीत जास्त तीन पुरस्कार दिले जाऊ शकतात.

'राष्ट्रीय बालकल्याण परिषदेच्या' वतीने दिले जाणारे हे शौर्य पुरस्कार स्थानिक जिल्हाधिकाऱ्यांच्या शिफारशीने दिले जातात. रोख रक्कम, पदक आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असते. कोणत्याही वर्षी ३० सप्टेंबरपर्यंत पुरस्कारासाठी नावे पाठवावी लागतात.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. पुरस्कार मिळवणाऱ्या मुलांना प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात गौरवाने सहभागी करून घेतले जाते.

पुरस्कारप्राप्त मुलामुलींना गरज असल्यास त्यांच्या पुढील शिक्षणासाठी, तसेच व्यावसायिक उच्च शिक्षणासाठी परिषदेच्या वतीने मदत केली जाते. त्यासाठी या धाडसी मुलांची शिफारस जिल्हाधिकाऱ्यांमार्फत परिषदेकडे केली जाते.



वीर बापूराव गायधनी यांच्या शौर्याची काल्पनिक चित्रे